**ई–फाईल**

**इतर किरकोळ फौ. अर्ज. क्र. १९/२०२६**
राजेंद्र मुथा व इतर १ **वि.** विलास पिंगळे व इतर २
निशाणी क्र. १ खाली

## <u>आदेशीका जारी करण्यापूर्वीचा साक्षीदार क्र.१ चा पुरावा</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की –

माझे नाव – राजेंद्र कोंडीराम मुथा
वय – ७१ वर्ष, व्यवसाय – व्यापार

राहणार – घर क्र.८९, जुमा मस्जीदजवळ शिवाजी चौक,
दौंड, ता. दौंड, जि. पुणे.

माझे वडिल नामे कोंडीराम रघुनाथ मुथा हे दिनांक २२/०५/१९९१ रोजी मौजे दौंड येथे मयत झाले. विलास पिंगळे, मोहित पिंगळे, अजित बोराटे व निलेश जगताप यांनी माझे वडिल मयत असतांना सुध्दा त्यांना जीवंत आहेत असे दाखवून मौजे भिगवण येथे जमीन गट क्र.२११/२/ड क्षेत्र ०३ हेक्टर २३ आर या शेतजमीनीचे सन २०२४ मध्ये खोटे व बनावट खरेदीखत तयार केले. तसेच सदर खरेदीखताबाबत मला कोणतीही कल्पना न देता. सदर खरेदीखतामध्ये मला रक्कम रु.६०,००,०००/– दिल्याचे दाखविले. सदरची रक्कम मला मिळाली नाही. नंतर सदर खरेदीखताबाबत मला माहिती झाल्यानंतर मी भिगवण पोलीस स्टेशन येथे रितसर लेखी तक्रार दिली होती परंतू त्यांनी आजतागायत आरोपींच्या विरुध्द कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे मी आरोपींच्या विरुध्द न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. आरोपींनी माझी फसवुणक केली आहे. सबब आरोपींना कडक शिक्षा व्हावी.

फिर्यादीची सही / अंगठा

RKMutha

दिनांक– ०६/०४/२०२६

समक्ष

( एम. एच. फारुकी )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, इंदापूर.